**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षासह आगामी काही वर्षं भारत ही जगातली सर्वात तेजीनं वाढणारी अर्थव्यवस्था राहण्याचा संयुक्त राष्ट्रांचा अंदाज

- लोकसभा निवडणुकीतल्या धक्क्यामुळं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केल्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कबुली

- हिमाचल प्रदेशात बस अपघातात १२ जणांचा मृत्यू, ३३ जण जखमी

- इराणमध्ये सुरू असलेल्या सरकारविरोधी आंदोलनामागे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा हात असल्याचा इराणचा दावा

**आणि**

- दशावतारसह एकूण ४ चित्रपट ऑस्करच्या सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र, कांतारासह ५ चित्रपट उत्कृष्ट चित्रपटांच्या यादीत

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात सुद्धा भारताचा आर्थिक विकास दर जगात सर्वाधिक राहण्याची शक्यता

संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक व्यवहार विभागानं वर्तवली आहे. २०२५-२६ मध्ये हा दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा या विभागाचा अंदाज आहे. २०२४-२५ मध्ये हा दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के होता. जगातल्या इतर सर्व देशांच्या तुलनेत हे दर सर्वाधिक आहेत. नागरिकांकडून होत असलेली खरेदी, सरकारकडून होत असलेली गुंतवणूक यामुळं हा विकासदर एवढ्या मोठ्या प्रमाणात असेल असं World Economic Situation and Prospects 2026 या अहवालात या संयुक्त राष्ट्रांनी म्हटलं आहे. नजिकच्या काळात झालेल्या कर सुधारणा, रिझर्व्ह बँकेकडून व्याजदरात झालेली कपात याचाही फायदा

अर्थव्यवस्थेच्या वाढीला मिळू शकतो, असं यात नमूद आहे. आगामी दोन आर्थिक वर्षात भारताचा विकास दर ६ पूर्णांक ६ दशांश टक्के आणि ६ पूर्णांक ७ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. या कालावधीत सुद्धा जगातल्या इतर देशांच्या तुलनेत भारताचा विकास दर अधिकच आहे.

**<><><><>**

संरक्षण सामग्री उत्पादनाबाबत संरक्षण क्षेत्राची स्वावलंबनाच्या दिशेनं आगेकूच सुरु आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आज उत्तर प्रदेशमध्ये म्हणाले. ते लखनौ जिल्ह्यातल्या सरोजिनी नगर मधल्या एका इलेक्ट्रिक वाहनांच्या कारखान्यांचं उदघाटन केल्यानंतर बोलत होते.

**<><><><>**

प्रसारभारतीच्या वेव्ह्ज या उपक्रमाचं जगभरात कौतुक होत असून त्यामुळे पाच हजार कोटी रुपयांच्या आंतरराष्ट्रीय व्यवसायाला चालना मिळाली आहे, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. आशयनिर्मिती करणाऱ्या निर्मात्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या DD NEWS वरच्या क्रिएटर्स कॉर्नर या कार्यक्रमाच्या अनावरण प्रसंगी बोलत होते.

**होल्ड... बाईट - अश्विनी वैष्णव**

हा कार्यक्रम सोमवार ते शुक्रवार या दरम्यान संध्याकाळी सात वाजता डीडी न्यूज वाहिनीवर प्रसारित करण्यात येईल. यात सहभागासाठी बातम्या, संस्कृती, पर्यटन, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि मनोरंजन यासारख्या विषयांवर १० मिनिटांचा उच्च दर्जाचा व्हिडीओ इच्छुकांना बनवावा लागेल.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीत महायुतीला बसलेल्या धक्क्यामुळे राज्यातल्या महायुती सरकारनं मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणायचा निर्णय घेतला, अशी कबुली उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिली. सगळ्यांनाच निवडून

यायचं असतं आणि अशा योजना लोकमत मिळवण्यासाठी आणल्या जातात. मध्य प्रदेशात अशाच प्रकारची योजना राबवणारे तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडून मार्गदर्शन घेतल्याचंही पवार यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.

<><><><>

हिमाचल प्रदेशच्या सिरमौर जिल्ह्यात आज दुपारी एक खासगी बस ५०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात १२ जण ठार झाले, तर इतर ३३ जखमी झाले. शिमल्यावरून हरीपूर धार इथं निघालेली ही बस रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे घसरली आणि उलटी होऊन दरीत कोसळली. यात १२ जण जागीच ठार झाले, तर ३३ जण गंभीररीत्या जखमी झाले.

<><><><>

छत्तीसगड मधल्या दंतेवाडा जिल्ह्यातल्या ६३ नक्षलवाद्यांनी आज केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये १८ महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. दोन दिवसांपूर्वी सुकमा जिल्ह्यातल्या २६ नक्षलवाद्यांनीही अशा प्रकारे आत्मसमर्पण केलं होतं.

<><><><>

सबरीमला इथल्या अय्यप्पा मंदिरातून सोनं चोरीला गेल्याप्रकरणी विशेष तपास पथकानं मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याला अटक केली आहे. आज सकाळी अज्ञात ठिकाणी त्याची चौकशी झाली आणि दुपारी एसआयटीच्या कार्यालयात हलवून त्याला अधिकृतरीत्या ताब्यात घेण्यात आलं. या प्रकरणातल्या मुख्य आरोपींनी दिलेल्या जबाबावरून ही अटक केल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

<><><><>

देशातल्या शेअर बाजारात सुरू असलेली घसरण आज सलग पाचव्या दिवशी कायम होती. दिवसअखेर सेन्सेक्स ६०५ अंकांनी घसरुन ८३ हजार ५७६ अंकांवर बंद झाला. निफ्टी १९५ अंकांची घट नोंदवून २५ हजार ६८३ अंकांवर स्थिरावला. या आठवड्यात सेन्सेक्स सुमारे २ हजार २०० आणि निफ्टी साडे ५०० अंकांनी घसरला आहे. अमेरिकेकडून संभाव्य करवाढीची भीती, जागतिक पातळीवरची राजकीय अस्थिरता यामुळं बाजारात ही घसरण दिसून येत आहे.

दरम्यान, सोनं आणि चांदीच्या दरात आज पुन्हा तेजी दिसून आली. मुंबईच्या सराफा बाजारात सुमारे ७ हजार रुपयांनी महाग झाल्यानं १ किलो चांदीसाठी करांसह अडीच लाख रुपये मोजावे लागत होते. सोनं आज तोळ्यामागे सुमारे तेराशे रुपयांनी महागलं. त्यामुळं एक तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४१ हजार रुपये तर १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ३७ हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम मोजावी लागत होती.

<><><><><>

आयआयटी मुंबई इथल्या सीडॅकमध्ये परम रुद्र या सुपर कम्प्युटरचं काल अनावरण झालं. हा सुपर कम्प्युटर सीडॅकने बनवलेल्या स्वदेशी बनावटीच्या रुद्र सर्व्हरवर आधारित आहे.

<><><><><>

भारत आणि अमेरिका या दोन्ही देशांना परस्परहिताच्या व्यापार करारात अजूनही रस आहे आणि हा करार तडीला न्यायला दोन्ही देश उत्सुक आहेत, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी आज वार्ताहर परिषदेत केलं. या कराराबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात ८ वेळा फोनवरून संवाद झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

इराणमध्ये सुरू असलेल्या सरकारविरोधी आंदोलनामागे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा हात असल्याचा आरोप इराणचे सर्वोच्च नेते अयातोल्लाह अली खामेनेई यांनी केला. आंदोलकांनी २६ बँका, २ रुग्णालयं आणि २५ मशिदींसह आर्थिक आणि सार्वजनिक मालमत्तांना लक्ष्य केल्याची माहिती तेहरानचे महापौर अलीरेझा झकानी यांनी दिली. २८ सप्टेंबर रोजी सुरू झालेल्या या संघर्षात आत्तापर्यंत लहान मुलांसह किमान ४५ आंदोलक ठार झाल्याचं, तर २ हजार २०० पेक्षा जास्त लोकांना अटक झाल्याचं मानवाधिकार समूहांनी सांगितलं आहे. यात ९५० पोलीस अधिकारी आणि बासिज या निमलष्करी दलाचे ६० सदस्य जखमी झाल्याचं इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेचं म्हणणं आहे.

<><><><>

इस्त्रायलने गाझापट्टीवर आज केलेल्या हल्ल्यात १३ जणांचा मृत्यू झाला. हमासच्या अयशस्वी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून दक्षिण आणि उत्तर गाझामधल्या हमासच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यासाठी हा हल्ला केल्याचं इस्त्रायली लष्करानं म्हटलं आहे.

<><><><>

रशियानं युक्रेनची राजधानी कीव्हमध्ये केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात ४ जणांचा मृत्यू झाला आणि २५ जण जखमी झाले. गेल्या महिन्यात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या निवासस्थानी युक्रेननं केलेल्या ड्रोन हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल हा हल्ला केल्याचा दावा रशियानं केला आहे.

<><><><>

कांतारा - द लिजंड चॅप्टर १, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टूरिस्ट फॅमिली, आणि सिस्टर मिडनाइट हे ५ भारतीय चित्रपट ऑस्करच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चर्सने आज ही घोषणा केली. याशिवाय दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो हे ४ चित्रपट

सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. एकंदर ३१७ चित्रपट ९८व्या ऑस्कर पुरस्कारांसाठी पात्र ठरले आहेत. त्यातल्या २०१ चित्रपटांकडे उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठीची अतिरिक्त पात्रता असल्याचं अकादमीनं जाहीर केलं. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी २२ जानेवारीला जाहीर होईल. याशिवाय भारताकडून आंतरराष्ट्रीय चित्रपट श्रेणीसाठी होमबाऊंड या चित्रपटाचं नामांकन करण्यात आलं आहे.

<><><><>

यंदाचा विकसित भारत युवा नायक संवाद हा उपक्रम २०४७ मधल्या विकसित भारताच्या संकल्पनांबाबत विचार मांडण्यासाठी युवकांना मंच उपलब्ध करून देईल, असा विश्वास केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आज आकाशवाणीला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केला.

//<><><><>//